भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022- 22660502

30 जुलै 2020

**बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 (एएसीएस्), कलम 56 चे वाचन करीता, कलम 35 अ अंतर्गत निर्देश कालावधी विस्तार- दी कपोल को-ओपरेटीव्ह् बँक लिमिटेड, मुंबई, महाराष्ट्र**

भारतीय रिझर्व्ह् बँकेकडून दिनांक 30 मार्च 2017 रोजी दिलेल्या निर्देश सं. DCBS.CO.BSD-I/D-9/12.22.111/2016-17 च्या अनुषंगाने दी कपोल को-ओपरेटीव्ह् बँक लिमिटेड, मुंबई, महाराष्ट्र वर दिनांक 30 मार्च 2017 ची कार्यालयीन वेळ संपल्यापासून दिशानिर्देश लादण्यात आले होते. वरील निर्देशाची वैधता वेळोवेळी वाढवण्यात आली होती ज्यामधे शेवटी दिनांक 29 जानेवारी 2020 रोजी दिलेल्या निर्देशित सं. DOR.CO.AID.No.D-53/12.22.111/2019-20 च्या अनुषंगाने दिनांक 31 जुलै 2020 पर्यंत वाढविण्यात आली होती.

2. जनतेच्या माहितीसाठी सुचना देण्यात येत आहे की, भारतीय रिझर्व्ह् बँक, बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 कलम 56 चे वाचन करीता, कलम 35 अ, उप कलम (1) अनुसार, आपल्या प्रदत्त अधिकाराचा वापर करून उपरोक्त बँकेला असा आदेश देत आहे की दिनांक 30 मार्च 2017 रोजी दिलेल्या निर्देश सं. DCBS.CO.BSD-I/D-9/12.22.111/2016-17 च्या अनुषंगाने दी कपोल को-ओपरेटीव्ह् बँक लिमिटेड, मुंबई, महाराष्ट्र वर दिनांक 30 मार्च 2017 रोजी जे दिशानिर्देश लादण्यात आले होते त्याची वैधता वेळोवेळी संशोधित केली होती ज्यामधे शेवटी दिनांक 31 जुलै 2020 पर्यंत ती वाढवण्यात आली होती जी की आता पुन्हा दिनांक 27 जुलै 2020 च्या सुधारित निर्देश सं. DOR.CO.AID.No.D-9/12.22.111/2020-21 द्वारा दिनांक 01 ऑगस्ट 2020 ते दिनांक 31 जानेवारी 2021 पर्यंत सहा महिन्यांसाठी वाढवण्यात आली आहे आणि ती पुनरावलोकनाधीन असेल.

3. संदर्भाधीन निर्देशातील इतर कोणत्याही नियम आणि अटी बदललेल्या नाहीत.

4. दिनांक 27 जुलै 2020 च्या सुधारित निर्देशाची प्रत बँकेच्या आवारात जनतेच्या माहितीसाठी लावण्यात आलेली आहे.

5. भारतीय रिझर्व्ह् बँकेच्या उपरोक्त मुदत वाढीमुळे आणि/किंवा निर्देशातील परिवर्तनामुळे जनतेने असे गृहीत धरू नये की, बँकेच्या सुधारलेल्या आर्थिक स्थितीवर भारतीय रिझर्व्ह् बँक समाधानी आहे.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाप्रबंधक

**प्रेस प्रकाशनी: 2020-2021/118**